**प्रेसनोट पुणे दि. २२/०४/२०१९**

**हरविलेल्या मुलास त्याच्या आई-वडीलांचा शोध घेवुन त्यांचे ताब्यात दिलेबाबतची उल्लेखनिय कामगिरी**

**भारती विद्यापीठ पोलीस ठाणे,पुणे शहर**

दि.२२/०४/२०१९ रोजी सकाळी ०९.३० वाजणेच्या दरम्यान भारती विद्यापीठ पोलीस ठाणे हद्दीतील कात्रज मार्शल पोना.घंटे व पोशि.खेडकर हे असे पेट्रोलिंग करीत आईना बेकरी संतोषगनर भागात असताना त्यांना एक वय-०२ वर्षे वयाचा मुलगा रडत व संशयितरित्या फिरत असताना मिळुन आल्याने त्यास त्यांचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांस काहीएक सांगता येत नसल्याने नमुद पोलीस कर्मचाऱ्यांनी पोलीस चौकीस आणुन सपोनि चिवडशेट्टी, पोहवा ३२३७ गांडले, पोशि पिसे यांचेसह नमुद बिट मार्शल पोना घंटे व पोशि खेडकर यांनी तसेच  ओळखीच्या लोकांच्या वॉट्सअपग्रपवर नमुद मुलाचा फोटो पाठवुन सदर लहानमुलांबाबत माहिती मिळाल्यास पोलीस ठाणेस कळविण्याची विनंती केली.

तसेच नमुद अधिकारी व कर्मचारी या सर्वानी मुलगा मिळुन आलेल्या भागात मुलासह पेट्रोलिंग करुन त्या मुलाचे आई-वडीलांबाबत चौकशी केली असता, त्या मुलाची आई मुलास शोधत असल्याचे निदर्शनास आले. ते पाहुन लहान मुलाने आईस पाहुन रडत तिचे दिशेने पळत जाऊ लागला असता, पोलीस अधिकारी कर्मचारी यांना नमुद महिला ही हरविलेल्या मुलाची आई असल्याचे निष्पन्न झाले.

तीस तीचे नाव व पत्ता याबाबत विचारणा करता, नमुद माहिलेचे नाव आसमा नदीम शेख, वय-२२ वर्षे, संतोषमाता नगर, कात्रज, पुणे तर मुलाचे नाव कु. साहिल नदीम शेख असल्याचे समजले. नमुद हरविलेल्या मुलाचे नातेवाईकांबाबत खात्री करुन त्यास त्यांचे ताब्यात दिले.

सदर कामगीरीबाबत चुकलेल्या मुलाची आई आसमा नदीम शेख यांनी समाधान व्यक्त करुन पोलिसांचे आभार मानलेले आहे.

(विष्णु शं. पवार)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक<br>
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर


भारती विद्यापीठ पोलीस ठाणे
(अंकीत)
कात्रज पोलीस चौकी
कात्रज पी.एम.टी. बस स्टॉप जवळ,कात्रज पुणे - ४६